# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १३०) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी–०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.१७ मे २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## ज्यांना पक्ष सोडायचा असेल त्यांनी सोडा; ममता बॅनर्जींचे वक्तव्य

कोलकाता दि.१६ (प्रतिनिधी)– पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने बहुमत मिळवत सरकार स्थापन केलं. या निवडणुकीत टीएमसी पक्षाचा दारूण पराभव झाल्यामुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला. निवडणुकीतील पराभवानंतर ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता, त्यामुळे भाजपा आणि टीएमसीच्या नेत्यांमध्ये आरोप–प्रत्यारोप झाल्याचंही पाहायला मिळालं होतं.

या सर्व घडामोडीनंतर आता पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षातील अंतर्गत वाद चव्हाट्यावर आल्याच्या चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहेत. कारण टीएमसीमधील खासदारांचा एक गट ममता बॅनर्जी यांच्यावर नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळे टीएमसी पक्षातही फूट पडण्याच्या चर्चा रंगल्या आहेत.

तसेच पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर टीएमसी पक्षातील काही नेते तळ्यात–मळ्यात म्हणजे पक्षांतर करण्याच्या प्रयत्नात असल्याच्या चर्चा आहेत. या पार्श्वभूमीवर बोलताना ममता बॅनर्जी यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'ज्यांना पक्ष सोडायचा असेल, त्यांनी खुशाल सोडा, मी पक्षाची पुनर्बांधणी करेन', असं ममता बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. या संदर्भातील वृत्त हिंदुस्तान टाईम्सने दिलं आहे.

# आधी करोना, मग युद्ध अन् आता इंधन संकट

## पंतप्रधान मोदींनी पुन्हा व्यक्त केली चिंता

नवी दिल्ली दि.१६ (प्रतिनिधी)– पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या नेदरलँड्स दौऱ्यावर असून त्यांनी तिथे आज भारतीय समुदायाशी संवाद साधला. हेग येथील कार्यक्रमात भारतीय समुदायाला संबोधित करताना मोदींनी म्हटलं की, जग अनेक आव्हानांचा सामना करत असताना भारत नवोन्मेष, आर्थिक विकास आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास येत आहे.'' तसंच त्यांनी या दशकाला आपत्तींचं दशक म्हणूनही संबोधलं.

''भारत ही तंत्रज्ञान आणि मानवता या दोन्हींवर आधारित संधींची भूमी आहे'', असं त्यांनी म्हटलं. ते म्हणाले, ''भारत जेव्हा यशस्वी होतो, तेव्हा पूर्ण मानवतेला त्याचा फायदा होतो. पण आज मानवतेसमोर अनेक मोठी आव्हानेही आहेत. सध्या आपण नव्या आव्हानांना तोंड देत आहोत. आधी करोना आला, मग युद्ध सुरू झाले. आता इंधन संकट आहे. हे दशक जगासाठी आपत्तींचं दशक बनलं आहे. आपण सर्व पाहतोय. ही परिस्थिती वेगाने नाही बदलली तर अनेक दशकांच्या कामगिरीवर पाणी फेरले जाईल. पुन्हा गरीबीच्या दलदलीमध्ये आपण ढकलले जाऊ '' अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले, अशा जागतिक परिस्थितीत जग रिझिलियन्ट सप्लाय चेनची चर्चा करत आहे. तेव्हा भारत आणि नेदरलँड्स एकत्र येऊन विश्वासू, पारदर्शक, भविष्य निर्धार सप्लाय चेन बनवायला तयार आहे. इंधन सुरक्षेपासून पाण्याच्या सुरक्षेपर्यंत नेदरलँड्स आणि भारत एकत्र काम करत आहेत. ग्रीन हायड्रोजनसाठी आमचं सहकार्य महत्त्वपूर्ण आहे. ते असंही म्हणाले की दोन्ही देश जागतिक स्तरावर अधिक जवळून एकत्र काम करू शकतात आणि मोठे आंतरराष्ट्रीय प्रकल्प मिळण्यासाठी सहकार्य करू शकतात.''

भारत आणि युरोप यांच्यातील वाढत्या आर्थिक संबंधांवर प्रकाश टाकत मोदी म्हणाले, प्रस्तावित भारत–युरोपियन यूनियन मुक्त करारामुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. युरोपमध्ये विस्तार करू इच्छिणाऱ्या भारतीय व्यवसायांसाठी नेदरलँड्स एक नैसर्गिक प्रवेशद्वार ठरणार आहे. द्विपक्षीय संबंध दृढ करण्यात भारतीय अनिवासी भारतीयांच्या भूमिकेची त्यांनी प्रशंसा केली आणि म्हणाले की, हा समुदाय दोन्ही देशांमध्ये एका विश्वासार्ह पुलाची भमिका बजावतो आणि लोकांमध्ये संबंध आणि आर्थिक सहकार्य वाढवण्यात महत्त्वपूर्ण योगदान देतो.

पंतप्रधान म्हणाले की,



आजचा भारत मोठी स्वप्ने पाहत आहे. भारताने चंद्रावर पोहोचून इतिहास रचला आहे, जिथे जगातील इतर कोणताही देश यापूर्वी पोहोचला नव्हता. जेव्हा नेदरलँड्सच्या नेतृत्वाशी संवाद साधला, तेव्हा त्यांनी नेहमीच भारतीय समुदायाची प्रशंसा केली. काळानुसार अनेक गोष्टी बदलल्या आहेत, पण भारतीय संस्कृती लोकांच्या हृदयात खोलवर रुजलेली आहे. काळ बदलला, पण मूल्ये आणि जिव्हाळा कायम आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

दरम्यान, भारत सेमीकंडक्टर क्षेत्रात वेगाने लक्षणीय प्रगती करत आहे. देशात सध्या १२ सेमीकंडक्टर प्रकल्प उभारले जात असून, त्यापैकी दोन प्रकल्पांमध्ये उत्पादन आधीच सुरू झाले आहे. हा देश जगातील सर्वांत मोठी सरकारी अनुदानित आरोग्य विमा योजना चालवतो. भारताने यूपीआय व्यवहारांच्या क्षेत्रात लक्षणीय यश मिळवले आहे. आज भारतात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स कार्यरत आहेत.

ज्याप्रमाणे नेदरलँड्स जगभर ट्यूलिप फुलांसाठी प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणे भारत कमळांसाठी ओळखला जातो, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

# 'नीट' पेपरफुटी प्रकरणात पुण्यातून महिला प्राध्यापक अटकेत; सीबीआयकडून कारवाई

पुणे दि.१६ (प्रतिनिधी)– देशभरात गाजत असलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील जीवशास्त्राच्या प्राध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली. मांढरे ही परीक्षा प्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. पेपरफुटी प्रकरणात ती सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर तिला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयने दिली.

मनीषा मांढरे ही वरिष्ठ प्राध्यापिका आहे. ती परीक्षा प्रक्रियेशी संबंधित आहे. या प्रकरणात तिची दिल्लीत चौकशी करण्यात आली. त्यानंतर तिला अटक करण्यात आली. परीक्षा प्रक्रियेशी संबंधित असल्याने तिचा वनस्पतीशास्त्र, तसेच प्राणीशास्त्र या विषयाच्या प्रश्नपत्रिकांशी संबंध होता. या प्रकरणात बिबवेवाडीतील ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली होती. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी तिच्या घरी बोलविले होते. तेथे प्रा. मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांना प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती तिने दिली होती. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर प्रा. मांढरेला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयकडून देणत आली.

'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून शुक्रवारी अटक केली. कुलकर्णी हा रसायनशास्त्राचा प्राध्यापक आहे. कुलकर्णी हा परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. पेपरफुटी प्रकरणात तो सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. कुलकर्णीची सीबीआयच्या पथकाने चौकशी केली. चौकशीत मांढरे ही या प्रकरणात सामील असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तिला सीबीआयने अटक केली.

'नीट' प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणात सीबीआयने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथून धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतले. लोखंडे हा पुण्यातील काही जणांच्या संपर्कात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर बिबवेवाडी परिसरात ब्यूटी पार्लर चालविणारी मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी (१३ मे) ताब्यात घेतले. धनंजय लोखंडे आणि मनीषा वाघमारे हिला अटक केली. या प्रकरणात जयपूरमधील तीन, गुरुग्राममधील एक आणि नाशिकमधील एका आरोपीचा समावेश आहे.

सीबीआयने देशातील वेगवेगळ्या भागांत छापे टाकले. कागदपत्रे, मोबाइल संच, तसेच अन्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली होती. जयपूर, ग्रुरुग्राम, नाशिकि, पुणे, अहिल्यानगर परिसरातून आतापर्यंत नऊ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील पाच आरोपींना सात दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. पुण्यातून प्रा. पी. व्ही. कुलकर्णी, मनीषा वाघमारे यांना अटक करण्यात आली आहे. त्यांना पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

## सर्वसामान्यांच्या कामासाठी आता मंत्रालयात येण्याची गरज नाही!, महसूलमंत्री बावनकुळे यांचा निर्णय

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)– घरे व शेतीविषयक शर्तभंग नियमितीकरणाचे महसूलमंत्र्यांकडे असणारे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना सोपविण्याचा ऐतिहासिक निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले.

या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. अनेकदा शर्तभंगाच्या अतिशय जुजबी प्रकरणात मंत्रालय गाठावे लागते. यासाठी वेळ, पैसा खर्च होतो. सर्वसामान्य जनतेला होणारा हा त्रास लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दहा लाखांपर्यंत दंड असलेली शर्तभंगाची प्रकरणे जिल्हाधिकाऱ्यांनी तसेच, वीस लाखांपर्यंत दंड असलेली प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे निकाली काढण्यासाठी सोपविली आहेत. या अधिकाऱ्यांच्या कार्यकक्षेबाहेरील प्रकरणांचे निर्णय मंत्रालयस्तरावर घेतले जातील, असे प्रसिद्ध झालेल्या राजपत्रात नमूद आहे.

राज्यभरात शर्तभंगाची प्रकरणे वाढत असल्याने अशा प्रकरणांच्या कायदेशीर निवड्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेमध्ये विधी व न्याय विभागाच्या निर्देशानुसार विधीमंडळाच्या गेल्या अधिवेशनात बदल करण्यात आले. त्यांनतर शुक्रवारी याबाबतचे राजपत्र जारी करण्यात आले. ज्या नागरिकांचे व्यवहार तांत्रिक अडचणींमुळे अडकले होते, त्यांना आता दिलासा मिळणार आहे. हा निर्णय घेण्यापूर्वी जनतेशी चर्चा करण्यात आली. यासंदर्भातील निवेदने सरकारकडे आली आहेत. नागरिकांना छोट्या–छोट्या प्रकरणांसाठी मंत्रालयात येण्याची गरज भासू नये, हा यामागचा उद्देश आहे.

## सरकारकडून ओबीसींच्या हक्कांना नख, राखीव प्रवर्गातील तरुणांना खुल्या प्रवर्गाच्या गुणवत्तेतून बाहेर काढण्याचा कट–विजय वडेट्टीवार

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)– काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर ओबीसींच्या हक्कांना नख लावल्याचा आरोप केला आहे. राखीव प्रवर्गातील तरुणांना खुल्या प्रवर्गाच्या गुणवत्तेतून बाहेर काढण्याचा कट महायुती सरकारने केला आहे. याद्वारे सरकारने ओबीसींच्या हक्कांनाच नख लावले आहे, असे ते म्हणालेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने राखीव प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांना निवडीनंतर खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही असा निर्णय घेतला आहे. पण हाच निर्णय आता वादात सापडला आहे. हा निर्णय एससी, एसटी व ओबीसी प्रवर्गावर अन्याय करणारा असून, राखीव प्रवर्गातील आरक्षण संपवण्याचा डाव आहे, असा आरोप या प्रकरणी केला जात आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही या प्रकरणी सरकारवर



निशाणा साधत हा ओबीसींच्या हक्कांना नख लावण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, ओबीसींनो आतातरी जागे व्हा! मतं बहुजनांची, पण निर्णय मात्र त्यांच्याच विरोधात! राखीव प्रवर्गातील तरुणांना खुल्या प्रवर्गाच्या गुणवत्तेतून बाहेर काढण्याचा कट महायुती सरकारने केला आहे. यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय झाला. हीच का तुमची बहुजन हिताची धोरणं? हा निर्णय म्हणजे आरक्षण विरोधी मानसिकतेचे जिवंत उदाहरण आहे!

निवडणुका आल्या की ओबीसी, मागासवर्गीय समाजाची आठवण येते, ओबीसी आमचा आहे अस म्हणणारे मुख्यमंत्री सत्तेत आले की ओबीसींच्या हक्कांना नख लावण्याचं काम पद्धतशीरपणे करतात. हा विश्वासघात आहे! मनुवादी मानसिकतेच्या पक्षांना मागासवर्गीय समाज फक्त व्होट बँक म्हणून हवा असतो. निर्णय प्रक्रियेत आणि हक्कांच्या वाट्यात मात्र त्यांना नेहमीच बाजूला सारलं जातं. पडद्यामागून आरक्षण विरोधी धोरणं राबवून बहुजनांचं अस्तित्व संपवण्याचा हा एक आत्मघातकी डाव खेळला जात आहे.

राखीव प्रवर्गात सवलती घेणाऱ्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गात बंदी घालण्यात आली आहे. वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता, अनुभव किंवा (पान ४ वर)

## भारतीय वस्तूंवर कर आकारणे नेपाळ सरकारला महागात

### सर्वोच्च न्यायालयाने बालेन शाहांच्या आदेशाला दिली स्थगिती!

काटमांडु दि.१६ (वृत्तसंस्था)– भारताच्या सीमाभागातून नेपाळमध्ये येणाऱ्या स्वस्त वस्तूंच्या आयातीवर सीमाशुल्क आकारण्याच्या बालेन शाह सरकारच्या वादग्रस्त धोरणाला नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने तात्पुरती स्थगिती दिली आहे. नेपाळ–भारत सीमेवरून आणल्या जाणाऱ्या १०० नेपाळी रुपयांपेक्षा ( १००) जास्त किमतीच्या जीवनावश्यक वस्तूंवरही शुल्क वसूल करण्याची मुभा या नियमामुळे अधिकाऱ्यांना मिळाली होती. या नियमावर सीमावर्ती भागातील नागरिकांनी आणि ग्राहकांनी तीव्र आक्षेप घेतला होता. परिणामी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती हरी प्रसाद फुयाल आणि टेक प्रसाद ढुंगाना यांच्या संयुक्त खंडपीठाने शुक्रवारी हा अंतरिम आदेश जारी करत पुढील आदेशापर्यंत या धोरणाला स्थगिती दिली आहे. सनडे गार्डियन लाईव्हने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

नेपाळच्या सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अंतरिम आदेशात पंतप्रधान कार्यालय, मंत्रिमंडळ, वित्त मंत्रालय आणि इतर संबंधित यंत्रणांना या वादग्रस्त नियमाची अंमलबजावणी अंतिम निकाल येईपर्यंत थांबवण्याचे निर्देश दिले आहेत. वित्त मंत्रालयाच्या या निर्णयाला आव्हान देणारी एक रिट याचिका दाखल झाल्यानंतर न्यायालयाने ही कारवाई केली. याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की, (पान ४ वर)

## माझ्या झुरळ टिप्पणीचा विपर्यास केला, ती टीका बोगस डिग्रीवाल्यांवर होती, बेरोजगार तरुणांवर नव्हे–सरन्यायाधीश सूर्यकांत

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)– सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी त्यांच्या झुरळ टिप्पणीवर स्पष्टीकरण दिले असून, माध्यमांनी त्यांच्या शब्दांचा चुकीचा अर्थ लावल्याचे त्यांनी म्हटले आहे. सरन्यायाधीशांनी सांगितले की, ''काल एका क्षुल्लक प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान मी केलेल्या तोंडी निरीक्षणांचा माध्यमांच्या एका विभागाने चुकीचा अर्थ लावला हे वाचून मला वेदना होत आहेत''

त्यांनी स्पष्ट केले की, ''मी विशेषतः त्या लोकांवर टीका केली होती ज्यांनी बनावट आणि बोगस पदव्यांच्या मदतीने वकिलीसारख्या व्यवसायात प्रवेश केला आहे. अशा व्यक्तींनी माध्यम, सोशल मीडिया आणि इतर उदात्त व्यवसायांमध्ये घुसखोरी केली आहे आणि म्हणूनच ते परोपजीवींसारखे आहेत. तरुणांवर टीका केल्याचा आरोप फेटाळून लावताना ते म्हणाले, मी आपल्या देशातील तरुणांवर टीका केली असे सुचवणे पूर्णपणे निराधार आहे. मला आपल्या वर्तमान आणि भविष्यातील मानवी संसाधनाचा केवळ अभिमानच नाही, तर भारतातील प्रत्येक तरुण मला प्रेरणा देतो.

सरन्यायाधीश सूर्य कांत पुढे म्हणाले, ''देशातील तरुणांचा मला अभिमान आहे. मी तरुणांना विकसित भारताचा आधारस्तंभ मानतो. मला वर्तमान आणि भविष्यातील मनुष्यबळाचा अभिमान आहेच, त्याशिवाय प्रत्येक भारतीय तरुण मला प्रेरित करतो. भारतीय तरुणांच्या मनात माझ्याबद्दल आदर आहे आणि मीही त्यांना विकसित भारताचे आधारस्तंभ मानतो, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.''

आपल्याला वरिष्ठ वकिलाचा दर्जा देण्याचे आदेश दिल्ली उच्च न्यायालयाला द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका एका वकिलाने दाखल केली होती. अशी याचिका वारंवार करत असल्याबद्दल सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली.

## चौथीतील विद्यार्थिनीसोबत शिक्षकाकडूनच संतापजनक कृत्य

### आईच्या तक्रारीवरून पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल, धरणगाव हादरलं!

जळगाव दि.१६ (प्रतिनिधी)– जळगावच्या धरणगाव तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकानेच इयत्ता चौथीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीचे लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक नंदलाल नारायण मराठे याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलगी ही आपल्या कुटुंबीयांसह धरणगाव तालुक्यातील एका गावात राहते. ती जि. प. शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. संशयित आरोपी शिक्षक नंदलाल मराठे हा तिला शाळा भरण्यापूर्वी सकाळी दहा वाजता झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. कुणी नसल्याचा फायदा घेऊन तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करायचा. इतकेच नव्हे तर तिला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिचा लैंगिक छळ करत असल्याचा संतापजनक प्रकार पुढे आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३० एप्रिल २०२६ रोजी शाळेच्या शेवटच्या दिवशी ही या नराधम शिक्षकाने तिच्यावर अत्याचार केला होता. याप्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून धरणगाव पोलिसांनी आरोपी शिक्षक (पान ४ वर)

## मनोज जरांगेंचे पुन्हा उपोषणाचे हत्यार; कुणबी प्रमाणपत्रांसाठी ३० मे पासून अंतरवालीत आमरण उपोषण

जालना दि.१६ (प्रतिनिधी)– मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा रणशिंग फुंकले आहे. ३० मे पासून मनोज जरांगे पाटील हे आंतरवाली सराटीत पुन्हा आमरण उपोषणाला बसणार आहेत. मराठा आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे बैठक बोलावली होते. यावेळी समर्थकांना संबोधित करताना त्यांनी ही घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आपण अडीच–तीन वर्षापासून लढत आहोत. समाजाच्या पदरात काय पडले? जून महिन्यात ॲडमिशन आहेत. ५८ लाख नोंदी निघाल्या आहेत. सरकार जळतंय, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही ही सरकारची भूमिका आहे. सत्तेशिवाय नाही तर मराठ्यांशिवाय शहाणपण चालत नाही. आपल्या समाजाचा एवढा द्वेष का? भाजपमधल्या मराठ्यांच्या लेकीबाळीला आरक्षण लागणार नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

आपल्याकडे रुपया नाही, पैशावाले आपल्यात येत नाहीत. मी प्रामाणिक आहे. आपल्याला वारंवार लढावं लागणार आहे. मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. मुंबईतील लोक आम्हाला पुन्हा येणार का? म्हणून विचारतात. आता आंदोलन असं करायचं की पुन्हा फडणवीसांना चारी दिशेला काही दिसले नाही पाहिजे. नुसते मराठेच दिसले पाहिजे.

मी फडणवीसांना दोष देत नाही. तुम्ही हैदराबादचा जीआर काढला पण तुम्ही का रोखले? फडणवीस तुम्हाला मंत्री मराठ्यांनीच केलंय. अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत, त्याला फडणवीस साहेबच जबाबदार आहेत. फडणवीस साहेबांनी विधानसभेत एक भाषण केलं होतं. मंत्र्यांना किंमत नाही, मुख्यमंत्रीच सर्वेसर्वा आहेत. याचा अर्थ तुम्हीच प्रमाणपत्र रोखले आहे, असा आरोप देखील मनोज जरांगे पाटील यांनी केला.

# तापमान ४६ अंशांच्या उंबरठ्यावर; पुढील १५ दिवस जीवघेणी उष्णतेची लाट

## नागरिकांनी उष्माघात आणि निर्जलीकरणापासून काळजी घेण्याचे डॉक्टरांचे आवाहन

नागपूर दि.१६ (प्रतिनिधी)– मध्य भारत सध्या तीव्र उष्णतेच्या विळख्यात सापडला असून नागपूर, विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअस दरम्यान आहे. हवामान विभागाने पुढील १५ दिवस कोरडे आणि अत्यंत उष्ण 'लू'चे वारे आणखी तीव्र होण्याचा इशारा दिला आहे. उष्णतेमुळे रुग्णालयांमध्ये उष्माघात, निर्जलीकरण, उलट्या–जुलाब आणि श्वसनविकारांच्या रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असून डॉक्टरांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन नागपुरातील क्रिम्स रुग्णालयाचे संचालक व ज्येष्ठ श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. अशोक अरबट आणि इतरही तज्ज्ञ डॉक्टरांनी केले आहे.

विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडमध्ये तापमान ४६ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून गरम वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. हवामान विभागाने पुढील १५ दिवस 'लू'चा धोका अधिक तीव्र राहण्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे वृद्ध, लहान मुले आणि बाहेर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. उष्माघात, गंभीर निर्जलीकरण, हीट एक्सॉशन, स्नायूंमध्ये गोळे येणे, उलट्या–जुलाब आणि तापाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

डॉक्टरांच्या माहितीनुसार, अनेक रुग्ण गंभीर निर्जलीकरणामुळे बेशुद्ध अवस्थेत रुग्णालयात दाखल होत आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा उष्णतेशी संबंधित आपत्कालीन रुग्णसंख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. उष्माघात ही जीवघेणी आपत्कालीन अवस्था मानली जाते. शरीराचे तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त वाढणे, घाम येणे बंद होणे, त्वचा कोरडी पडणे, चक्कर येणे, गोंधळ उडणे, हृदयाचे ठोके वाढणे आणि बेशुद्ध पडणे ही त्याची प्रमुख लक्षणे आहेत. योग्य वेळी उपचार न मिळाल्यास रुग्णाचा जीव धोक्यात येऊ शकतो.

प्रचंड उष्णतेमुळे शरीरातील पाणी आणि क्षार झपाट्याने कमी होतात. त्यामुळे तोंड कोरडे पडणे, गडद लघवी होणे, अशक्तपणा, चक्कर येणे आणि हृदयावर ताण येणे अशी लक्षणे दिसतात. डॉक्टरांच्या मते, पुरेसे पाणी न पिल्यास गंभीर निर्जलीकरण होऊ शकते. दूषित अन्न आणि पाण्यामुळे फूड पॉइझनिंग, कॉलरा, डिसेंट्री, हिपॅटायटिस आणि टायफॉइडसारखे आजार वाढण्याचा धोका असतो. रस्त्यावरील उघडे अन्नपदार्थ आणि दूषित पाणी सेवन केल्यास उलट्या–जुलाब व तापाचे प्रमाण वाढू शकते. उन्हात काम करणारे मजूर, बांधकाम कामगार, वाहतूक कर्मचारी, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांना सर्वाधिक धोका आहे. तसेच दमा, मधुमेह, हृदयरोग, मूत्रपिंड विकार आणि फ फ्फुसांच्या आजारांनी त्रस्त रुग्णांनी अधिक काळजी घेण्याची गरज आहे.

सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत शक्यतो घराबाहेर पडू नये. दिवसाला किमान ३ ते ४ लिटर पाणी प्यावे. पाण्यात मीठ–साखर मिसळून घ्यावी. ताक, नारळपाणी, कैरी पन्हे, लिंबूपाणी आणि टरबूज यांसारखे थंड पदार्थ खावेत. हलक्या रंगाचे सैल सुती कपडे वापरावेत. रस्त्यावरील उघडे अन्न आणि दूषित पाणी टाळावे. घरात ओआरएस, पॅरासिटामॉल, अँटॅसिड आणि आवश्यक औषधे उपलब्ध ठेवावीत.

डोकेदुखी, ताप, चक्कर, अतिघाम किंवा अशक्तपणा जाणवल्यास त्वरित विश्रांती घ्यावी आणि डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्माघाताची लक्षणे दिसताच रुग्णाला सावलीत किंवा थंड जागी हलवावे. तातडीने जवळच्या रुग्णालयाशी संपर्क साधावा किंवा १०८ रुग्णवाहिका सेवेला फोन करावा. डॉक्टरांच्या मते, उपचारात होणारा प्रत्येक मिनिटाचा विलंब जीवघेणा ठरू शकतो.

## राज्यात तासाला एका महिलेवर अत्याचार, महिला अपहरणात महाराष्ट्र देशात पहिला–रोहित पवार

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)– उत्तर प्रदेशनंतर आता महाराष्ट्र महिलांसाठी सर्वात असुरक्षित राज्य बनत चालले असून, राज्यात तासाला एका महिलेवर अत्याचार होत आहे, महिला अपहरणात महाराष्ट्र देशात पहिला आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे. शक्ती कायद्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची मागणी करत त्यांनी ३१,१४१ गायब झालेल्या मुलींच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केला आहे.

रोहित पवार म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्रित येण्याचा विषय अजित पवार असताना चर्चेत होता. मात्र आता



आमच्याकडून तो विषय पूर्णपणे बाजूला ठेवण्यात आला आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजित पवार यांच्या पक्षात सध्या सुरू असलेल्या अंतर्गत घडामोडींवर बोट ठेवत, त्यांच्या पक्षात सध्या काहीही व्यवस्थित सुरू नाही, अशी थेट टीकाही रोहित पवारांनी केली.

रोहित पवार म्हणाले की, राज्यात (पान ४ वर)

# सायबर संस्कार ही एक आवश्यक गरज

**एव्हाना** आपण सर्वांनीच सायबर जगतात आणि त्या निमित्ताने एका नव्या विश्वात प्रवेश केला आहे. या जगतात आपल्याला अनुकूल आणि जगणे सूखकर करणारी अनेक तंत्रे समाविष्ट आहेत. गेल्या दशकातील तंत्रज्ञान विकास व अंमलबजावणीच्या वेगापेक्षा पुढील दशकातील वेग अधिक दखलपात्र असेल. सर्वांना, विशेषतः एकविसाव्या शतकात जन्माला आलेल्या पिढीला इथे वावरताना जास्त सतर्क व जागरूक राहावे लागेल.

मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मनुष्य. चांगला विचार आणि कृती होण्यासाठी संस्कारांची गरज असते. आजचे युग पूर्णपणे डिजिटल झालेय. एकविसाव्या शतकात संगणक आणि मोबाइल क्रांतीने जीवनपद्धतीचे सर्व संदर्भ बदलेले आहेत. आज प्रौढ वयात संगणक अथवा इंटरनेटशी संबंध आलेली पिढी आणि जन्मापासून संगणकीय युगातच वावरणारी म्हणजे साधारण २०००नंतर जन्मलेली मुले-मुली यांच्या इंटरनेटकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक असणार आहेच. इंटरनेट वापराच्या ३० टक्के एवढा वेळ सोशल नेटवर्किंग आणि ब्लॉग्जसाठी खर्च केला जातो, जो ई-मेलपेक्षा ही जास्त आहे. गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट वापरकर्त्यांच्या प्रमाणात जगभर लक्षणीय वाढ होत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. अनेकदा वेळ नसल्याने पालक आणि पाल्यांचा संवाद कमी होत आहे. त्यामुळे संगणक, मोबाइल, टीव्ही ही उपकरणे मुलांच्या संवादाची साधने बनली आहेत. ८-१४ वयोगटातील बरेच विद्यार्थी याच्या आहारी जाऊन तेच आपले विश्व असल्याच्या भ्रमात वावरतात. त्यामुळे नैराश्य, दुभंगलेले व्यक्तिमत्त्व आदी समस्यांमुळे काहीजण आत्महत्येचा मार्गही स्वीकारत आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक वस्तू, उपकरण हे 'स्मार्ट' असणे ही आज चैन नसून गरज बनत चालली आहे. सतत इंटरनेटचा वापर हे सुद्धा एक व्यसनच बनत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. शेवटी आपण लक्षात घेतले पाहिजे की तंत्रज्ञान हे सुऱ्यासारखे असते. एखादे फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याची हत्या करण्यासाठीही ते वापरले जाऊ शकते. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात, तसेच अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना सावधपणा अंगी बाळगणे जरूरीचे असते. आजच्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांना स्मार्टफोन द्यायच्या आधी तो कसा वापरावा याचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. तंत्राला वापरणारे मन, विचार हे त्याचा वापर ठरवते. अमेरिकेत अनेक वेळा शाळकरी मुलांवर खुनी हल्ले झालेत. ते आत्तापर्यंत कुठल्या तरी हाडामासाच्या विकृत खूनही व्यक्तीने केलेत. पण भविष्यात कदाचित स्वयंचलित वाहन किंवा यंत्रमानव असे गुन्हे करू शकेल. त्यावेळी हत्या करणारा कोण हे ठरवणे अवघड असेल. माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमताही प्राप्त झाली. सायबर तंत्रज्ञानाद्वारे चालवली जाणारी अशी युद्धे आत्तापर्यंतच्या लढायांपेक्षा फार वेगळी असणार आहेत. कोणतीही प्रत्यक्ष सीमारेषा नसलेली आणि फार वेगाने पसरणारी. यापुढे शाळा, महाविद्यालयांमध्येही संगणक किंवा स्मार्टफोनच्या दुष्परिणामांवर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयातही याचा समावेश करायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा वापर नेमका कसा करावा, सोशल मीडियावर माहिती पोस्ट करताना कोणती काळजी घ्यावी, सेल्फीचे व्यसन मर्यादित असावे; किंबहुना ते व्यसन बनूच नये, योग्य पद्धतीने चलतचित्रण करणे, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवायचे, सायबर कायदे कसे पाळायचे आणि सायबर गुन्हेगारी करणाऱ्यांना झालेल्या शिक्षा या महत्त्वाच्या बाबींची माहिती द्यायला हवी. हे प्रशिक्षण गांभीर्याने द्यायला, घ्यायला हवे. तरच त्याची परिणामकारकता जाणवेल आणि उपयुक्तता सिद्ध होईल. पूर्वी फक्त भौतिक गोष्टींची सुरक्षा गणली जायची. आता सायबर सुरक्षा आणि सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब झाली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपारिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत.

आगामी काही वर्षांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, यंत्रमानव (रोबोटिक्स), इंटरनेट ऑफ थिंग्स यासारख्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात जगाच्या भल्यासाठी अनेक क्रांतिकारी शोध लागतील. या संशोधनाचा वापर करून नवीन उत्पादने बनू शकतील आणि बनतीलही. पण हेच सर्व तांत्रिक प्रवाह एखाद्या विकृत, गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तीच्या हाती पडल्यास नाशही होऊ शकतो. यामुळेच एमआयटी, स्टॅनफर्ड, हार्वर्डसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये संगणक तंत्रज्ञांना आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नैतिकता, नीतिमूल्य या मूलभूत विषयांवर सक्तीचा अभ्यासक्रम विकसित होत आहे. त्यामुळे काय बरोबर आहे व काय चूक आहे हे समजून घेणे कसे गरजेचे आहे, हे नव्या पिढीला, तंत्रज्ञांना कळेल आणि या बाबी ते आचरणात, व्यवहारात आणतील, असा त्यांचा होरा आहे. हा प्रवाह काही वर्षांमध्येच भारतीय शिक्षणपद्धतीमध्येही अंतर्भूत होईल. अस्तित्वात असलेल्या मानवी नातेसंबंधांचा दर्जा आणि खुमारी वाढवण्यासाठी तंत्रज्ञान वापरा, पण सोशल नेटवर्किंग साइटवर जाऊन मित्र-मैत्रिणी शोधू नका, अशा ई-नातेसंबंधांचे मानवी व्यक्ती ऋणानुबंधात फार क्वचित रुपांतर होते, हे आता समजून घ्यावे आणि प्रसंगी समजावून सांगावे लागेल. त्यातून अनेकदा गुन्हेगारीचे प्रकार घडतात. सर्वच इंटरनेट वापरकर्ते सभ्य आणि सुसंस्कृत असतीलच असे नाही. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात तसे अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना अंगी सावधपणा बाळगणे जरूरीचे असते.

कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. तंत्रज्ञानाचेही असेच आहे. गरज असेल तरच मुलांनी ते वापरावे. वेळ जात नसेल तर मैदानी खेळ, कला, बाह्य क्रिया, योगा, फिरणे, संगीत असे अनेक पर्याय आहेत. इंटरनेट न वापरायचीही सवय झाली पाहिजे. माझा एक मित्र रविवारी इंटरनेट अजिबात वापरत नाही. या बाबतीतही स्वतःवर बंधन आणि शिस्त आवश्यक आहे. अनेकजण स्वतःवर ते घालून घेतात तर अनेकजण मुळातच संतुलन राखून सोशियल मीडिया, इंटरनेटचा वापर करतात. या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, माफक प्रमाणात आणि हवे असेल तेव्हाच आपण हे तंत्रज्ञान वापरले तर त्याचे अनेक फायदे आहेत, मात्र अनाठायी, उठता-बसता सायबरजगतात रमायची सवय लागली, तर नजिकच्या काळातच या सवयीचे रुपांतर व्यसनामध्ये होऊ शकते आणि पाहता पाहता मुले या तंत्राच्या आहारी जाऊ शकतात. सायबरचोरीचे, या तंत्रामुळे निर्माण होणाऱ्या गुंत्याचे तोटे समजून घेतले आणि समजावून दिले, तर भविष्यात या विश्वात वावरणे सोयीचे होईल, अन्यथा त्याचा बाऊ करणे किंवा त्यापासून दूर राहण्याचा मार्ग अनेकजण स्वीकारताना दिसतील.

# पुणे-मुंबई : सातवाहनांच्या पायवाटेपासून 'कनेक्टिंग लिंक'पर्यंतचा प्रवास

**दख्खनच्या** पठाराला कोकणाच्या किनाऱ्यापासून वेगळं करणारी सह्याद्री पर्वतरांग ही जणू निसर्गाने उभी केलेली अभेद्य भिंतच. या भिंतीला भेदून तयार झालेले घाट म्हणजे त्या जिद्दीचा साक्षीदार. त्यापैकी भोर घाट हा सर्वात महत्त्वाचा, ऐतिहासिक आणि सतत वापरात राहिलेला मार्ग. आज आपण पुणे-मुंबई प्रवास हा काही तासांत पार करतो. पण पूर्वी त्यासाठीच काही दिवसांचा कालावधी लागत असे. या प्रवासाची कथा म्हणजे हजारो वर्षांच्या बदलत्या काळाची, बदलत्या तंत्रज्ञानाची आणि बदलत्या गरजांची कहाणी आहे.

**सातवाहन काल : व्यापार, संस्कृती आणि घाटवाटा**

सातवाहन काळात सह्याद्री पर्वतरांग ओलांडण्याची गरज प्रामुख्याने व्यापारामुळे निर्माण झाली. कोकण किनाऱ्यावरील बंदरे सोपारा, कल्याण, चौल ही परदेशी व्यापाऱ्यांसाठीची प्रवेशद्वार होती. रोमन साम्राज्याशीही व्यापार होत असल्याचे पुरावे आजही जुन्नर, तेर येथे सापडल्याचे पुरावे तेथील वस्तुसंग्रहालयात पाहायला मिळतात. या बंदरांवर उतरलेला माल दख्खनमध्ये पोहोचवण्यासाठी घाटवाटा तयार झाल्या. त्या पायवाटा होत्या. रस्ता नव्हता; पण मार्ग होता.

व्यापारी काफिले, जनावरे आणि माणसे या घाटातून प्रवास करत असत. या प्रवासात धोके होते. वन्य प्राणी, दरोडेखोर, आणि कठीण भूप्रदेश. तरीही हा मार्ग जिवंत राहिला कारण तो गरजेचा होता. या मार्गातून केवळ वस्तूंची देवाण-घेवाण झाली नाही, तर संस्कृती, भाषा, धर्म आणि विचारही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात पोहोचला. सह्याद्री हा अडथळा नसून, संवादाचा पूल ठरला.

**मध्ययुगीन सत्ताकाळ** – यादव, बहामनी आणि आदिलशाही सत्तांच्या काळात या घाटमार्गांचा वापर वाढला. सत्तेला विस्तार हवा होता आणि त्यासाठी जलद संपर्क आवश्यक होता. घाटवाटा अधिक वापरात आल्या, काही प्रमाणात सुधारल्या गेल्या. पण या मार्गाला खऱ्या अर्थाने सामरिक धार मिळाली ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात. सह्याद्रीच्या किल्ल्यांच्या जाळ्यातून मराठा सत्तेने घाटांवर नियंत्रण मिळवलं. लोहगड किल्ला आणि विसापूर किल्ला हे किल्ले भोर घाटावर नजर ठेवून होते. घाटातून होणारी प्रत्येक हालचाल या किल्ल्यांच्या देखरेखीखाली होती. त्यामुळे हा मार्ग केवळ व्यापाराचा राहिला नाही; तो संरक्षण, गुप्त हालचाली आणि युद्धनीतीचा महत्त्वाचा भाग बनला.

**ब्रिटिश कालखंड : पायवाट ते दगडी रस्ता**

१८१८ मध्ये इंग्रजांनी महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या दृष्टीने मुंबई-पुणे संपर्क अत्यंत महत्त्वाचा ठरला. व्यापार, प्रशासन आणि लष्करी हालचालींसाठी एक सक्षम रस्ता आवश्यक होता. त्यामुळे १८३० च्या दशकात भोर घाटात दगडी रस्ता बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. हा रस्ता घोडागाडी आणि बैलगाडी चालेल असा होता. पुढे घाटातील वळणं सांभाळून, उतार-चढाव नियंत्रित करत हा रस्ता उभारण्यात आला. हा टप्पा म्हणजे पुणे-मुंबई मार्गाचा आधुनिक जन्म. हजारो वर्षांच्या पायवाटांना आता एक ठोस, अभियांत्रिकी पायाभूत सुविधा मिळाली.

**रेल्वेचा चमत्कार : सह्याद्रीतून लोहमार्ग**

ब्रिटिशांनी पुढे एक पाऊल टाकत 'ग्रेट इंडियन पेनीनसुला रेल्वे' (महान भारतीय द्वीपकल्प रेल्वे) मार्फत भोर घाटातून रेल्वेमार्ग उभारला. १८६३ मध्ये हा मार्ग सुरू झाला. हे काम त्याकाळी अत्यंत कठीण होते. डोंगर फोडणे, बोगदे खोदणे, पूल बांधणे ही आव्हाने होती. पण यामुळे सह्याद्री ओलांडण्याची संकल्पना बदलली. प्रवास जलद, नियमित आणि सुरक्षित झाला.

**स्वातंत्र्यानंतर : राष्ट्रीय महामार्ग ते द्रुतगती मार्ग** – स्वातंत्र्यानंतर भारताने या मार्गाचा विकास पुढे चालू ठेवला. पुणे-मुंबई मार्ग राष्ट्रीय महामार्गात विकसित झाला. पण वाढत्या वाहतुकीमुळे घाटातील वळणं आणि अपघातांची समस्या वाढू लागली. यावर उपाय म्हणून २००२ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग सुरू करण्यात आला. हा भारतातील पहिला सहा पदरी द्रुतगती मार्ग ठरला. प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि वेगाला नवे परिमाण मिळाले. पुण्याच्या विकासासाठीही मोठे सकारात्मक परिणाम झाले.



**औद्योगिक आणि आयटी विकासाला मोठी चालना** – पूर्वी मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास वेळखाऊ होता. द्रुतगती मार्गामुळे हा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला. त्यामुळे पुणे हे मुंबईला पर्यायी औद्योगिक आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून वेगाने पुढे आले. हिंजवडी आयटी पार्क, तळवडे, खराडी, मगरपट्टा, चाकण, रंजनगाव यासारख्या भागांचा विकास झपाट्याने झाला. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पुण्यात गुंतवणूक केली.

**पुणे-मुंबई आर्थिक पट्टा**– द्रुतगती मार्गामुळे पुणे आणि मुंबई यांच्यातील आर्थिक संबंध अधिक मजबूत झाले. अनेक व्यावसायिक मुंबईत बैठक घेऊन त्याच दिवशी पुण्यात परत येऊ लागले. लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, वाहतूक आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. लोणावळा, खोपोली, तळेगाव या मधल्या पट्ट्यातही आर्थिक हालचाली वाढल्या.

**रिअल इस्टेटचा मोठा विस्तार** – द्रुतगती मार्गानंतर पुण्यातील बांधकाम व्यवसायाने प्रचंड वेग घेतला. हिंजवडी, वाकड, बाणेर, पिंपरी-चिंचवड, तळेगाव, रावेत, चाकण या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प उभे राहिले. मुंबईत काम करणाऱ्या काही लोकांनीही पुण्यात स्थायिक होण्यास सुरुवात केली.

**पर्यटन आणि विकेंड संस्कृती वाढली**

लोणावळा, खंडाळा, मावळ परिसर हा विकेंड पर्यटनाचा प्रमुख पट्टा बनला. पुणे आणि मुंबईतील लोकांचा परस्पर प्रवास वाढला. रिसॉर्ट्स, हॉटेल्स, फूड मॉल्स, ॲडव्हेंचर पर्यटन यांचा व्यवसाय वाढला.

**शिक्षण क्षेत्राचा विस्तार** – पुणे आधीपासून शिक्षणाचे केंद्र होते; पण द्रुतगती मार्गामुळे देशभरातील विद्यार्थ्यांसाठी पुणे अधिक सहज उपलब्ध झाले. खासगी विद्यापीठे, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि आयटी शिक्षण संस्थांचा विस्तार झाला.

**पिंपरी-चिंचवडचा वेगवान शहरी विस्तार**

ऑटोमोबाईल उद्योग आणि द्रुतगती मार्ग यांचा एकत्रित परिणाम म्हणून पिंपरी-चिंचवड महानगराचा झपाट्याने विस्तार झाला. वाहन उद्योग, पुरवठा साखळी आणि पूरक उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले.

**पुण्याची जीवनशैली बदलली**

द्रुतगती मार्गानंतर पुणे अधिक 'मेट्रो शहर' म्हणून विकसित होऊ लागले. मॉल संस्कृती, कॉर्पोरेट जीवनशैली, आयटी प्रोफेशनल्सची वाढ, उच्च उत्पन्न गट, नवीन टाउनशिप्स यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला.

**'कनेक्टिंग लिंक' : आधुनिक अभियांत्रिकीचा शिखरबिंदू**

तरीही खंडाळा-लोणावळा घाटातील काही भाग अपघातप्रवण आणि वेळखाऊ राहिला. याच समस्येवर उपाय म्हणून 'कनेक्टिंग (मिसिंग ) लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली. खोपोली ते कुसगाव या दरम्यानचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी करणे आणि प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी घटवणे, हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश. सुमारे ६,६९५ कोटी रुपयांच्या खर्चातून हा प्रकल्प उभारण्यात आला. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि मान्यवर मंत्री, सचिव यांच्या उपस्थितीत १ मे रोजी करण्यात आले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने हा मार्ग वाहनांसाठी खुला करण्यात आला आणि सह्याद्री ओलांडण्याच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला.

**पूल आणि बोगदे : अभियांत्रिकी कमाल**

या प्रकल्पात दोन समांतर बोगदे आणि दोन उंच पूल उभारण्यात आले आहेत. ८.९२ किलोमीटर लांबीचा बोगदा लोणावळा तलावाच्या सुमारे १८० मीटर खाली खोदण्यात आला आहे. तसेच १८४ मीटर उंच केबल-आधारित पूल (तारांच्या आधारावर उभारलेला पूल) हा अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या प्रकल्पामुळे घाटातील धोकादायक वळणं टाळली जातील. वाहतुकीचा अखंड प्रवाह राखला जाईल. इंधनाची बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट, या सर्व बाबींचा थेट फायदा प्रवाशांना होणार आहे. अत्याधुनिक अग्निसुरक्षा, हवाप्रवाह व्यवस्था आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली (संगणकीय नियंत्रण व्यवस्था) यामुळे हा मार्ग अधिक सुरक्षित बनला आहे.

**महाकाय प्रकल्पांची उभारणी : आधुनिक तंत्रज्ञान आणि आव्हानांची शर्यत**

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलणाऱ्या समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकसारख्या प्रकल्पांची उभारणी करणे हे केवळ इंजिनिअरिंगचे (अभियांत्रिकीचे) काम नसून ते एक मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक आव्हान होते. हे प्रकल्प साकारताना निसर्गाची प्रतिकूलता आणि तांत्रिक क्लिष्टता यांचा मोठा सामना करावा लागल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी अधोरेखित केले आहे.

**बोगद्यांचे जाळे आणि सुरक्षिततेचे कवच**

बोगद्यात केवळ रस्ता तयार करणे पुरेसे नव्हते, तर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तिथे एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते. बोगद्यात नैसर्गिक सूर्यप्रकाश नसतो आणि हवेची हालचाल मर्यादित असते. अशा वेळी, वाहनांच्या धुरामुळे कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण वाढू नये म्हणून तिथे शक्तिशाली 'जेट फॅन्स' (वेगवान हवेचे पंखे) बसवले जातात. तांत्रिक बिघाडामुळे एखादी गाडी बोगद्यात बंद पडली, तर सुरक्षिततेच्या दृष्टीने दर ३०० ते ५०० मीटरवर 'क्रॉस पॅसेज' (आंतरजोड मार्ग) आणि 'इमर्जन्सी पार्किंग बे' (आपत्कालीन वाहन थांबा) दिलेले असतात. 'ऑटोमॅटिक इन्सिडेंट डिटेक्शन सिस्टिम' (स्वयंचलित घटना शोध प्रणाली) मुळे एखादे वाहन थांबल्यास नियंत्रण कक्षाला तातडीने संदेश जातो, ज्यामुळे भ्रमणध्वनी सेवा नसतानाही मदत पोहोचू शकते.

**वाऱ्याचा वेग आणि केबल-स्टेड ब्रिजचे आव्हान**

कनेक्टिंग लिंक प्रकल्पांतर्गत लोणावळ्याजवळील दरीत जो भव्य केबल-स्टेड ब्रिज (ताराधारित पूल) उभारला गेला, तिथे सर्वात मोठे आव्हान वाऱ्याच्या वेगाचे होते. १८४ मीटर उंचीचे पायलान्स (आधारस्तंभ) आणि दरीतील प्रचंड वारा यामुळे पुलाच्या स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो. हे लक्षात घेऊन, या पुलाचे डिझाइन (आराखडा) अशा प्रकारे करण्यात आले आहे की, ताशी शेकडो किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा दाब हा पूल सहज पेलू शकेल. या पुलाच्या पायाभरणीसाठी वापरण्यात आलेल्या एका 'फुटिंग'चे (पाया रचना) वजन तब्बल १०,००० टन आहे. जे या कामाच्या अवाढव्यतेची साक्ष देते.

**कामाची गती आणि सकारात्मक दृष्टीकोन**

गायकवाड एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले, भूसंपादनावेळी झालेला विरोध असो किंवा घाटातील कठीण भौगोलिक परिस्थिती, या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसते, तर जोखीम घेण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टीकोन आवश्यक असतो. आम्ही प्रतिकूलतेत संधी शोधली आणि त्यामुळेच आज महाराष्ट्र वेगवान रस्ते विकासाच्या जागतिक नकाशावर ठळकपणे दिसत आहे.‍ त्यांच्या या बोलण्यातून हे काम किती आव्हानात्मक होते याची जाणीव होते.

**जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा आणि 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'**

यशवंतराव चव्हाण मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील बोगद्याची जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा म्हणून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली आहे. 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'च्या प्रतिनिधींनी जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'ने या बोगद्याची रुंदी जगात सर्वाधिक २२.३३ मीटर अशी जाहीर केली. या प्रकल्पाच्या कामात अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. कोविड-१९ महामारी, मुसळधार पाऊस, कठीण खडक, वन परवानग्या. तरीही अभियंते आणि कामगारांनी चिकाटीने हे काम पूर्ण केले. सातवाहनांच्या पायवाटेपासून सुरू झालेला हा प्रवास आज 'कनेक्टिंग (मिसिंग) लिंक'पर्यंत पोहोचला आहे. सह्याद्री तसाच आहे.. बदलल्या आहेत त्या त्याला ओलांडण्याच्या पद्धती. हा मार्ग आजही केवळ प्रवासाचा नाहीः तो इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा जिवंत दुवा आहेः मिसिंग लिंकचा नवा थरारक अध्याय नव्या महाराष्ट्राच्या घडणीतील महत्त्वाचे पान ठरणार आहेः!

**– युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

# सोमनाथ पर्व: भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक

**भारतीय** संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.

१७८३ मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून, हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे.

आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. 'सोम' म्हणजे चंद्र आणि 'नाथ' म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्त्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे. अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

**– माधुरी मिसाळ,**
राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग

# मोबाइलपायी माणसा; कागा येडापिसा???...

## (१७ मे: आंतरराष्ट्रीय दूरसंचार दिवस विशेष.)

**जागतिक दूरसंचार दिन म्हणून दरवर्षी हा दिवस संपूर्ण जगभर साजरा करण्यात येतो. इ.स.१८६५ साली आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाची स्थापना करण्यात आली होती. दूरसंचारचे महत्व तसेच त्याची जागरूकता पसरविण्यासाठी दरवर्षी १७ मेला जागतिक दूरसंचार दिवस साजरा करण्यात येतो. दूरसंचाराच्या क्रांतीमुळे आज विश्वभर खुप मोठ्या प्रमाणात बद्दल घडून आले आहेत. दूर असलेल्या व्यक्ती सोबत संपर्क करणे शक्य झाले आहे. पृथ्वीवर घडलेला हा एक अविस्मरणीय बदलच म्हणावा लागेल. अशी रोचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दांतून वाचा... संपादक.**



**मानवाने** बुद्धीच्या जोरावर विविध शोध लावून विस्मयकारक प्रगती केली. आज त्याची प्रचिती आपणा सर्वांना येतच आहे. यातील महत्त्वपूर्ण म्हणजे इंटरनेट, संगणक व मोबाईल यांचा शोध होय. हे शोध लागण्यापूर्वीही म्हणजेच राजे रजवाड्यांच्या युगातही संदेशवहन होत होते. मात्र त्या संदेशवहनात बराच वेळ वाया जात असे. मात्र एकोणीसाव्या शतकापासून मानवाने दळणवळणाच्या साधनांमध्ये अनेक आश्चर्यकारक शोध लावले. त्यामुळे मानवाची अधिक वेगाने कल्पनातीत प्रगती होऊ लागली. टेलिफोनच्या शोधाने संदेशवहनाचे अवघड काम सोपे झाले. याचे सर्व श्रेय अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांना जाते. ध्वनीची कंपने विद्युतप्रवाहाच्या सहाय्याने तारेतून पाठवता येणे शक्य आहे, असे लक्षात येताच बेल यांनी प्रयत्नांती टेलिफोनचे पहिले ओबडधोबड यंत्र बनवले. जगभरातील दूरसंचार क्षेत्रात नियमन करण्यासाठी दि.१७ मे १८६५ रोजी आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटनेची-इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनची स्थापना झाली. त्या दिवसाचे औचित्य साधून सन १९७३पासून १७ मे हा दिवस जगभर दूरसंचार दिन म्हणून साजरा होत आहे. पुढे संगणकाच्या आगमनाबरोबर दूरसंचार व माहिती तंत्रज्ञानाची प्रगती अफाट वेगाने होऊ लागली. कालांतराने संगणकाला इंटरनेटची जोड मिळून सर्व संगणक दूरध्वनीच्या माध्यमातून एकमेकांशी जोडल्याने संगणकाचे जाळे तयार झाले. या महाजालामुळेच एका गणकयंत्रावर टाईप केलेला संदेश दुर्सया गणकयंत्रावर दिसू लागला. अशाप्रकारे संगणक, इंटरनेट व दूरध्वनी- मोबाइलच्या शोधाने जग जवळ आले. या निमित्ताने नव्या संकल्पनांची देवाणघेवाण, राष्ट्रीय संकल्पनेवरील वादविवाद, चर्चा आदी कार्यक्रम राबविण्यात येतात. परिणामी बिनतारी संपर्क दिन व माहितीच्या पतपेढीचा दिवस हे दोन्ही एकत्रित साजरे होऊ लागले. आज विकसित तंत्रज्ञानामुळे केवळ संवादापुरते मर्यादित असलेल्या दूरध्वनीचा इतर व्यवहारोपयोगी कामांसाठीही उपयोग होऊ लागला. दूरध्वनी अथवा भ्रमणध्वनीच्या सहाय्याने त्वरीत संपर्क साधणे शक्य झाले आहे.

सन १८८०मध्ये ओरिएंटल टेलिफोन कंपनी लिमिटेड आणि अँग्लो-इंडियन टेलिफोन कंपनी लिमिटेड यांनी भारतात टेलिफोन एक्सचेंजची स्थापना करण्यास भारत सरकारशी संपर्क साधला. टेलिफोन स्थापित करणे ही सरकारची मक्तेदारी आहे व सरकारच हे काम सुरू करेल, या कारणावरून ही परवानगी नाकारली गेली. पुढे सरकारने आपल्या निर्णयाच्या विरोधात जाऊन इंग्लंडच्या ओरिएंटल कंपनी लिमिटेडला कोलकाता, मुंबई, चेन्नई आणि अहमदाबाद यांत टेलिफोन एक्सचेंज सुरु करण्याचे लायसेंस देण्यात आले. सन १८८१मध्ये देशात पहिली औपचारिक टेलिफोन स्थापन झाली. २८ जानेवारी हा दिवस भारताच्या टेलिफोन इतिहासात रेड लेटर डे आहे. या दिवशी भारतीय परिषदेचे तत्कालीन गव्हर्नर जनरल मेजर ई.बेरिंग यांनी कोलकाता, चेन्नई व मुंबई येथे टेलिफोन एक्सचेंज सुरू करण्याची घोषणा केली. कोलकाता एक्सचेंजला सेंट्रल एक्सचेंज असे नाव देण्यात आले. या सेंट्रल एक्सचेंजचे सुमारे ९३ ग्राहक होते. मुंबईत देखील एक वर्षात अशाच एका टेलिफोन एक्सचेंजचे उद्घाटन करण्यात आले. सद्या दूरसंचारचा महत्त्वाचा एक भाग इंटरनेट आहे. ज्यामुळे मानवी जीवनाला सुरेख कलाटणी मिळाली आहे. इंटरनेटने आपले आयुष्य बदलून टाकले आहे. कोणतीही सूचना आपण काही सेकंदातच मिळवून घेतो. इंटरनेट हे सोशल नेटवर्किंग पासून ते स्टॉक एक्सचेंज, बँकिंग, ई-शॉपिंग इत्यादीसाठी महत्त्वाचे आहे. याचे सर्व श्रेय गुगलसारख्या सर्च इंजिनला जाते. गुगलमुळे हजारो किलोमीटर दूर असलेली व्यक्ती चॅटिंग, व्हिडीओ, व्हॉइस चॅटिंग यांद्वारे काही सेकंदातच जवळ आलेली जाणवते. हे अंतर आता खुप कमी झाले आहे. ज्याप्रकारे इंटरनेटने आपले जीवन सहज केले; तर आव्हानही समोर उभे ठाकले आहे. आज इंटरनेटवरील काम कमी मात्र त्याचा गैरवापर अधिक होत आहे. पोर्नोग्राफीसारख्या समस्या इंटरनेटच्या प्रत्येक भागात पोहोचल्या आहेत. सायबर गुन्हेगारी तर वाढतच आहे. या सर्व नकारात्मक गोष्टी असूनही आज भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशांत टेलिकम्युनिकेशन तंत्रज्ञान समृद्धीसाठी उपयुक्त ठरत आहे. याक्षेत्रातील सतत होणाऱ्या विकासाचा परिणाम म्हणून अनेक तरुण चांगल्या करिअरचे स्वप्न घेऊन पुढे येत आहेत. वर्ल्ड टेलिकॉम डे किंवा जागतिक दूरसंचार दिन दरवर्षी १७ मे रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आधुनिक युगात फोन, मोबाइल, इंटरनेट ही माणसाची पहिली गरज बनली आहे. याशिवाय जीवनाची कल्पना करणे अवघड आहे. वैयक्तिक ते व्यावसायिक जीवनापर्यंत याचे महत्त्व खुप आहे. पूर्वी लोकांना एकमेकांशी संपर्क साधण्यास खुप संघर्ष करावा लागत असे. आज इंटरनेट, मोबाइल यांमुळे हे सहज शक्य झाले. आपण काही सेकंदातच आपले मित्र, कुटुंबिय, नातेवाईक यांच्याशी सहज बोलू शकतो, त्यांना बघू देखील शकतो. हे सारे दूरसंचार क्रांतीमुळे शक्य झाले. यामुळेच भारताची गणना विकसनशील देशांमध्ये केली जाऊ लागली. त्याबरोबरच भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढतेय. त्यासह नोव्हेंबर २००६ साली तुर्कीमध्ये पूर्ण झालेल्या परिषदेत जागतिक दूरसंचार, माहिती व सोसायटी हे तिनही एकत्रितपणे साजरे करण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्वी केवळ महत्त्वाच्या कामासाठीच दूरध्वनीचा वापर होत असे. आता मात्र स्वस्त कॉल रेटमुळे त्वरीत संपर्क केला जातो, मग काम महत्त्वाचे असो वा नसो. दूरसंचार माध्यमांमुळे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या खुपच जवळ आली, ही माध्यमे मानवाची नितांत गरजच नव्हे तर गळ्यातील ताईत बनली आहेत. प्रिय व्यक्ती तासनतास दूर असली तरी काही वाटणार नाही. मात्र आज मोबाइल आपल्यापासून क्षणभरही दूर असलेले चालत नाही. परिणामी केवळ शहरी नागरिकांपर्यंत मर्यादित राहिलेला मोबाइल आज देशातील ग्रामीण जनतेच्या हातातही सर्रासपणे आढळतो. इंटरनेटच्या ४जी, ५जीपर्यंत वाढलेल्या वेगाने आर्थिक-बँकिंग व्यवहार, आरोग्य सेवा-सुविधा एका क्लिकवर मिळिवणे सोपे झाले आहे.

दूरसंचार क्षेत्रातील प्रगतीमुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली व खर्चही वाढला. असे असले तरी दूरसंचार क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा दूरगामी परिणाम दिसतो, तशाच आज मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होत असल्याच्याही घटना समोर येत आहेत. यालाच थोडक्यात सायबर क्राईम असे म्हणतात. सायबर क्राईम रोखण्यास दूरसंचार क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानाचा वापर आपण जबाबदारीने करायला हवा. आजच्या दूरसंचार दिनी याचेही भान आपण ठेवले पाहिजे. ही दूरसंचार क्रांती आज कामाचा वेग वाढविण्यास तसेच एका व्यक्तीचा दुर्सया व्यक्तीशी त्वरीत संपर्क होण्यास महत्त्वाचा दुवा ठरली आहे. !! आंतरराष्ट्रीय दूरसंचार दिनाच्या सर्वांना प्रेरणादायी हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(भारताच्या वैभवशाली इतिहास-अस्मितेचे गाढे अभ्यासक.)

# उन्हाळ्यात जनावरांना होणारी विषबाधा आणि उपाययोजना

**उन्हाळ्याच्या** दिवसांमध्ये तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने जनावरांच्या आरोग्यावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या काळात जनावरांमध्ये उष्माघात, पाण्याची कमतरता, पचनाचे विकार यांसह विषबाधेच्या घटनाही वाढताना दिसतात. विषबाधा ही गंभीर समस्या असून वेळेवर उपचार न झाल्यास जनावरांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकरी व पशुपालकांनी या विषयाबाबत जागरूक राहणे अत्यंत आवश्यक आहे.

**विषबाधा होण्याची प्रमुख कारणे :** उन्हाळ्यात चाऱ्याची टंचाई निर्माण झाल्यामुळे जनावरे अनेकदा उपलब्ध असलेली कोणतीही वनस्पती खातात. यामध्ये धोतरा, आकोडा, करट, रानमेथी यांसारख्या विषारी वनस्पतींचा समावेश असू शकतो. अशा वनस्पतींचे सेवन केल्यास जनावरांना विषबाधा होण्याची शक्यता वाढते. याशिवाय शेतात फवारणी केलेल्या चाऱ्यावर राहिलेले कीटकनाशकांचे अंश, रासायनिक खते किंवा औद्योगिक रसायनांचा संपर्क हे देखील विषबाधेचे महत्त्वाचे कारण आहे. काही वेळा कुजलेला किंवा बुरशी लागलेला चारा जनावरांना दिला जातो. अशा चाऱ्यातून तयार होणारे विषारी घटक जनावरांच्या शरीरात जाऊन गंभीर परिणाम करतात.

प्लास्टिक, कचरा, तेलकट पदार्थ किंवा रंगयुक्त वस्तू खाल्ल्याने जनावरांच्या पचनसंस्थेवर परिणाम होतो. तसेच औषधांचा अति प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने वापर केल्यासही विषबाधा होऊ शकते.

**विषबाधेची लक्षणे :** विषबाधा झाल्यानंतर जनावरांमध्ये काही ठळक लक्षणे दिसून येतात. भूक मंदावणे किंवा पूर्णपणे बंद होणे, तोंडातून फेस येणे, लाळ गळणे, बेचैनी, इकडे-तिकडे धावणे, श्वास घेण्यास त्रास होणे, पोट फुगणे किंवा जुलाब होणे अशी लक्षणे सामान्यतः दिसतात. गंभीर अवस्थेत स्नायूंमध्ये कंप सुटणे, डोळे फिरणे किंवा अचानक मृत्यू होण्याची शक्यता देखील असते. त्यामुळे अशी लक्षणे दिसताच त्वरित उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**तात्काळ उपाययोजना :** विषबाधा झाल्याचा संशय आल्यास सर्वप्रथम जनावराला विषारी पदार्थांपासून दूर करावे. तोंडामध्ये उरलेले विषारी पदार्थ काढून टाकावेत आणि स्वच्छ, थंड पाणी पाजावे. कोणतेही घरगुती उपाय किंवा औषधे स्वतःहून देऊ नयेत. तातडीने जवळच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योग्य उपचार घ्यावेत. वेळेवर उपचार मिळाल्यास जनावराचा जीव वाचविणे शक्य होते.

**प्रतिबंधात्मक उपाय :** विषबाधा टाळण्यासाठी शेतकरी व पशुपालकांनी काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जनावरांना देण्यात येणारा चारा व खाद्यपदार्थ स्वच्छ व दर्जेदार असावा. कीटकनाशके आणि रसायने सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. शेतातील विषारी वनस्पती ओळखून त्या नष्ट कराव्यात. जनावरांच्या गोठ्याभोवती स्वच्छता राखणे, नियमित पशुवैद्यकीय तपासणी करणे आणि पुरेसे स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणेही महत्त्वाचे आहे. उन्हाळ्यात जनावरांची योग्य काळजी घेतल्यास विषबाधेचा धोका मोठ्या प्रमाणात कमी करता येतो. शेतकऱ्यांनी जागरूक राहून प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणल्यास जनावरांचे आरोग्य चांगले राहून आर्थिक नुकसान टाळता येऊ शकते. जनावरे ही शेतकऱ्यांची महत्त्वाची संपत्ती असल्याने त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक पशुपालकाची जबाबदारी आहे.

# सोमनाथ 'स्वाभिमान पर्व': श्रद्धेच्या विजयाची आणि भारताच्या सांस्कृतिक पुनरुत्थानाची १००० वर्षे

**भारताच्या** पश्चिम किनारपट्टीवर, जिथे अथांग अरबी समुद्र भगवान शिवाच्या चरणांचे प्रक्षालन करतो, तिथे उभे असलेले प्रभास पाटनचे सोमनाथ मंदिर केवळ एक वास्तू नाही, तर ते भारताच्या अजेय आत्मसन्मानाचे जिवंत प्रतीक आहे. शिवपुराणात उल्लेखिलेल्या द्वादश ज्योतिर्लिंगांमधील प्रथम स्थान म्हणून सोमनाथाचे महत्व अनन्यसाधारण आहे. परंतु, आज जेव्हा आपण २०२६ या वर्षात पदार्पण केले आहे, तेव्हा हे मंदिर एका ऐतिहासिक कालखंडाचे साक्षीदार म्हणून आपल्यासमोर उभे आहे.

हे वर्ष भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरले गेले आहे. या वर्षाचे महत्व दोन प्रमुख कारणांसाठी आहे. जानेवारी १०२६ मध्ये आक्रमक महमूद गजनीने सोमनाथ मंदिरावर पहिले भीषण आक्रमण केले होते. या घटनेला या वर्षात १००० वर्षे पूर्ण होत आहेत. हे पर्व त्या सर्व वीर आत्मबलिदानांचे स्मरण करण्याचे निमित्त आहे, ज्यांनी या मंदिराच्या रक्षणासाठी आणि अस्मितेसाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. तसेच मे १९५१ मध्ये स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नूतन सोमनाथ मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली होती. या ऐतिहासिक घटनेला २०२६ मध्ये ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. म्हणजेच, हे वर्ष सोम नाथ मंदिराच्या 'अमृत महोत्सवा'चेही आहे.

शतकानुशतके परकीय आक्रमकांनी या मंदिराला लुटले, त्याची मोडतोड केली. त्यांचा उद्देश केवळ संपत्ती लुटणे हा नव्हता, तर भारताचा सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कणा मोडणे हा होता. परंतु, प्रत्येक आक्रमणाने भक्तांची श्रद्धा अधिकच दृढ झाली. जितक्या वेळा हे मंदिर पाडले गेले, तितक्याच जोमाने भारतीयांनी पुन्हा त्याची उभारणी केली.

स्वातंत्र्यानंतर लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या पुनर्बांधणीचा जो संकल्प सोडला, तो केवळ एका मंदिराचा जीर्णोद्धार नव्हता, तर तो गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होणाऱ्या भारताचा उद्घोष होता. सरदार पटेलांचा हाच वारसा पुढे नेण्याचे कार्य पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

सोमनाथ हे केवळ शिवाचे धाम नाही, तर ते भगवान श्रीकृष्ण आणि शक्तीच्या उपासनेचेही पावन स्थान आहे. हे मंदिर प्राचीन काळापासून भारताचे आर्थिक आणि सांस्कृतिक केंद्र राहिले आहे. येथील 'स्वाभिमान पर्वा'चा उद्देश आपल्या गौरवशाली वारशाची ओळख नव्या पिढीला करून देणे हा आहे. 'स्वाभिमान पर्व' हे केवळ उत्सवाचे साधन नसून, ते आपल्या सामूहिक संकल्पाचे प्रतीक आहे.

सोमनाथ मंदिराची कथा ही विजयाची कथा आहे. अन्यायावर न्यायाच्या, विनाशावर सृजनाच्या आणि अंधारावर प्रकाशाच्या विजयाची. १०२६ मधील त्या काळरात्रीपासून सुरू झालेला हा प्रवास आज २०२६ मध्ये एका वैभवशाली भारताच्या उदयापर्यंत येऊन पोहोचला आहे. सोमनाथचा हा जिर्णोद्धार जगाला सांगतो की, भारत आता केवळ स्वतंत्र झालेला देश नाही, तर तो आपली प्राचीन ओळख आणि वैभव पुन्हा प्राप्त करणारा 'विश्वगुरु' बनण्याच्या मार्गावर असलेले राष्ट्र आहे.

या 'स्वाभिमान पर्वा'च्या निमित्ताने आपण सर्वजण या पवित्र भूमीला नमन करूया आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी व संस्कृतीच्या रक्षणासाठी कटिबद्ध होऊया.

**-ॲड. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री, महाराष्ट्र राज्य.

# नागरिकांकडून एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना

**यंदाचा** उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ - ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे.

वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९˚ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. परभणीत ३७ वर्षीय व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला असून, अहिल्यानगरात ४५ वर्षीय महिला शेतकरी शेतात काम करताना दगावली. नागपूर जिल्ह्यात बसने प्रवास करणाऱ्या ६५ वर्षीय प्रवाशाचा मृत्यू झाला, अशी उदाहरणे देता येतील. उष्णतेच्या लाटांमुळे शरीरातील पाणी कमी होणे (डिहायड्रेशन), उष्माघात आणि मृत्यूच्या प्रमाणात वाढ झाली आहे. सध्याच्या परिस्थितीत स्वतःची काळजी घेणे, मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करणे आणि ऊन टाळून कामे करणे, हेच आपल्या हातात आहे. आरोग्य विभागाने दुपारी घराबाहेर न पडण्याचे, सुती कपडे वापरण्याचे आणि भरपूर पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. मात्र, केवळ तात्पुरत्या उपाययोजनांनी हे संकट टळणारे नाही, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक तापमान वाढीमुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत आहे, ज्याचा थेट परिणाम भारताच्या उन्हाळ्यावर होत आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत रस्त्यावर शुकशुकाट पाहायला मिळत असल्याने अनेक शहरात 'अघोषित संचारबंदी' अनुभवला मिळत आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

# पेपरफुटीनंतर मोठा निर्णय; NEET परीक्षा आता २१ जून २०२६ होणार!

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - देशभरातील लाखो विद्यार्थ्यांची प्रतीक्षा अखेर संपली असून नीट परीक्षा २०२६ ची नवी तारीख अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. पेपरफुटीच्या गंभीर आरोपांमुळे ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम, भीती आणि प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, आता अखेर आयोगाकडून नवीन तारीख जाहीर करण्यात आली आहे. देशभरात २ मे २०२६ रोजी नीट परीक्षा पार पडली होती. मात्र परीक्षा संपल्यानंतर काही तासांतच पेपरफुटीचे गंभीर आरोप समोर आले. या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली. सुरुवातीला काही राज्यांमधून संशय व्यक्त करण्यात आला, मात्र नंतर राजस्थान, हरियाणा, महाराष्ट्रातील नाशिक, अहिल्यानगर आणि लातूरपर्यंत या रॅकेटचे धागेदोरे पोहोचल्याचे समोर आले. काही आरोपींना अटकही करण्यात आली आहे. तपासादरम्यान अनेक धक्कादायक खुलासे होत असून काही विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका पोहोचल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

हे संपूर्ण प्रकरण अत्यंत गंभीर मानत केंद्र सरकारने तात्काळ हालचाली सुरू केल्या. प्रकरणाचा तपास थेट सीबीआयकडे सोपवण्यात आला. सीबीआयने प्राथमिक चौकशीत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे संकेत दिल्यानंतर परीक्षा प्रक्रिया थांबवण्याचे आदेश देण्यात आले. त्यानंतर ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. दरम्यान, आता नीट परीक्षा २०२६ची नवी तारीख जाहीर करण्यात आली असून २१ जून २०२६ रोजी देशभरात पुन्हा परीक्षा घेण्यात येणार आहे. आयोगाने अधिकृत घोषणा करत विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा तयारीसाठी वेळ दिला आहे. मात्र, परीक्षा पुन्हा द्यावी लागणार असल्याने अनेक विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे वातावरण कायम आहे. गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांकडून आणि पालकांकडून मोठ्या प्रमाणावर आंदोलनं आणि नाराजी व्यक्त केली जात होती. या संपूर्ण प्रकरणावर चर्चा करण्यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या दिल्लीतील निवासस्थानी काल रात्री उशिरापर्यंत उच्चस्तरीय बैठक पार पडली. ही बैठक तब्बल दोन तास चालली. बैठकीत नीट आणि नेट परीक्षेतील पेपरफुटी, सुरक्षा व्यवस्था, परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीला उच्च शिक्षण सचिव सचिन विनीत जोशी, शालेय शिक्षण सचिव संजय कुमार, एनटीएचे महासंचालक अभिषेक सिंह, राहुल सिंग आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

आयोगाने यापूर्वीच सीबीआयला पूर्ण सहकार्य करण्याचे स्पष्ट केले आहे. तपासादरम्यान नाशिकहून राजस्थानपर्यंत आणि राजस्थानहून हरियाणापर्यंत पेपर पोहोचल्याची माहिती समोर आली आहे. यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. काही मोठी नावेही या प्रकरणात समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे सीबीआयकडून कसून चौकशी सुरू आहे. आता २१ जून रोजी होणारी नीट परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पडावी यासाठी केंद्र सरकार आणि आयोगाकडून विशेष खबरदारी घेतली जात आहे. देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य या परीक्षेशी जोडलेले असल्याने प्रशासनावर मोठी जबाबदारी आहे.

## नाशिक : भोंदूबाबा खरात प्रकरणात उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे पाटील यांचे निलंबन

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) - शेकडो महिलांच्या शोषणाचे आणि आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात याच्या पापात प्रशासकीय अधिकारीही भागीदार असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. खरातशी असलेले संशयास्पद आर्थिक हितसंबंध आणि तब्बल १४३ वेळा झालेला संवाद उपजिल्हाधिकारी अभिजीत भांडे पाटील यांना चांगलाच भोवला असून, गुरुवारी राज्य सरकारने त्यांना शासन सेवेतून तडकाफडकी निलंबित केले.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबतचे आदेश जारी केले. त्यानुसार, अभिजीत भांडे पाटील यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीला बेकायदेशीर फायदा पोहोचवल्याचे प्राथमिक अवलोकनात दिसून आले आहे.

त्यांच्यावर गोपनीय माहिती लीक करणे आणि त्या बदल्यात आर्थिक लाभ मिळवल्याचे गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. 'एका शासकीय अधिकाऱ्याला ही वर्तणूक अशोभनीय असून यामुळे शासनाची प्रतिमा मलिन झाली आहे,' अशा स्पष्ट शब्दांत सरकारने त्यांच्यावर ताशेरे ओढले आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे उल्लंघन केल्याप्रकरणी त्यांची आता विभागीय चौकशीही केली जाणार आहे.

तपासादरम्यान अशोक खरात आणि भांडे पाटील यांच्यातील संभाषणाचे धक्कादायक तपशील समोर आले आहेत. ४ एप्रिल २०२५ ते १५ मार्च २०२६ या कालावधीत त्यांच्यात तब्बल १४३ वेळा संवाद झाला असून, एकूण १० हजार ३७ सेकंद चर्चा झाल्याची नोंद आहे. विशेषतः ७ जुलै आणि २३ नोव्हेंबर २०२५ रोजी एकाच दिवसात अनेक वेळा कॉल झाल्याचे स्पष्ट झाले आहे. इतकेच नव्हे तर, खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावावर असलेल्या जमिनींमध्ये भांडे यांनी गुंतवणूक केल्याचाही प्राथमिक आरोप आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांसाठी विशेष मेळावा

## घराच्या स्वप्नपूर्तीसाठी मनपा, विकासक आणि बँकांचा एकत्रित पुढाकार



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत शहरातील विविध ठिकाणी गृहप्रकल्पांची कामे सुरू असून हर्सूल येथे गट क्रमांक २१६ येथील एकूण ५०४ सदनिकांच्या प्रकल्पासंदर्भात आज लाभार्थ्यांसाठी विशेष मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्याचे उद्घाटन स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते करण्यात आले.

अशा प्रकारचा लाभार्थी मेळावा आयोजित करण्याची संकल्पना महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ आणि स्थायी समिती सभापती मकरिये यांनी मांडली होती. त्यानुसार आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुढाकारातून प्रथमच हर्सूल येथील प्रकल्पस्थळी हा मेळावा आयोजित करण्यात आला.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील पाच ठिकाणी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत गृहप्रकल्प राबविण्यात येत आहेत.

या योजनेच्या पहिल्या टप्प्यात लॉटरी प्रक्रियेद्वारे पात्र ठरलेल्या सुमारे ३५० लाभार्थ्यांसह दुसऱ्या टप्प्यातील लॉटरी प्रक्रियेत सहभागी नागरिकांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला होता.

लाभार्थी, विकासक, महानगरपालिका प्रशासन आणि विविध बँकांचे प्रतिनिधी यांना एकाच छताखाली आणून नागरिकांना गृहकर्ज प्रक्रिया सुलभ, पारदर्शक आणि सहज पद्धतीने पूर्ण करता यावी, हा या मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. यावेळी उपस्थित बँक प्रतिनिधींनी गृहकर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, व्याजदर, मासिक हप्ते तसेच कर्ज मंजुरी प्रक्रियेबाबत लाभार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

मार्गदर्शन करताना सभापती अनिल मकरिये यांनी लाभार्थ्यांना आवाहन केले की, लकी ड्रॉमध्ये पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांनी येत्या २२ मेपर्यंत आवश्यक १० टक्के रक्कम जमा करावी,

जेणेकरून शासनाचा पुढील हप्ता उपलब्ध होऊन गृहप्रकल्पाचे बांधकाम वेगाने पूर्ण करता येईल. तसेच त्यांनी विकासकांकडून एका वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण करून लाभार्थ्यांना घराच्या चाव्या देण्याचे आश्वासन घेत उपस्थित नागरिकांमध्ये उत्साह निर्माण केला.

यावेळी सारा बिल्डर्सचे सीताराम अग्रवाल, निलेश अग्रवाल, पीएमसीचे लक्ष्मीकांत सुर्वे, स्वप्निल श्रॉफ, अतिरिक्त आयुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे, उपायुक्त श्रीमती अपर्णा थेटे तसेच प्रधानमंत्री आवास योजना विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच आवास फायनान्स, स्वतंत्र फायनान्स, वंडर फायनान्स, टायगर फायनान्स, IIFL Finance, Piramal Finance, State Bank of India आणि Devgiri Bank यांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या अभिनव उपक्रमामुळे लाभार्थी आणि महानगरपालिका प्रशासन यांच्यात विश्वासाचे नाते अधिक दृढ झाले असून अनेक कुटुंबांचे स्वतःच्या हक्काच्या घराचे स्वप्न लवकरच पूर्ण होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत डेंग्यू दिन साजरा



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- जागतिक डेंग्यू दिवसानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेमार्फत डेंग्यू प्रतिबंध व जनजागृती अभियानांतर्गत आज दिनांक १६/०५/२०२६ रोजी बन्सीलालनगर रुग्णालय येथे साथरोग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत माहितीपर व जनजागृतीपर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

सदर उपक्रम महापौर समीर राजूरकर, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, विरोधीपक्ष नेते समीर साजिद, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, आयुक्त अमोल येडगे, तसेच वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभापती डॉ.श्रीमती सुनिता सोळुंके यांच्या आदेशानुसार व वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आला.

या वेळी वैद्यकीय सहाय्य व आरोग्य समिती सभापती डॉ. श्रीमती सुनिता सोळुंके, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांच्या प्रमुख उपस्थितीत फित कापून उद्घाटन करण्यात आले त्यावेळी नागरिकांना डेंग्यू प्रतिबंधासाठी आवश्यक खबरदारी, स्वच्छतेचे महत्त्व, डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना तसेच घर व परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डेंग्यूच्या डासांच्या अळ्या, डास तसेच गप्पी मासे यांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. नागरिकांना डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करून प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती देण्यात आली व त्यांच्याकडून डेंग्यू प्रतिबंधाची प्रतिज्ञा घेण्यात आली.

तसेच, दिनांक २६/०४/२०२६ ते ०९/०५/२०२६ या पंधरवड्यात सिद्धार्थ उद्यान, मध्यवर्ती बसस्थानक, रेल्वे स्थानक, सिडको बसस्टँड, गजानन मंदिर, डी-मार्ट, प्रोझोन मॉल, शाहनूर मिया दर्गा, जामा मस्जिद आणि शहरातील इतर विविध भागांमध्ये साथरोग प्रतिबंधाबाबत जनजागृतीपर प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमास सहाय्यक वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. उज्वला भामरे, बन्सीलाल नगर आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकुमार ठाकूर, डॉ. आदित्य जोशी, सौ. मनीषा पाटील, श्री. मिलिंद जबंगी, श्री. दिगंबर कोठलकर, बन्सीलालनगर रुग्णालय येथील सर्व स्टाफ तसेच मलेरिया विभागाचे क्षेत्रीय पर्यवेक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

यावर्षीच्या जागतिक डेंग्यू दिवसाचे घोषवाक्य "Community Participation Dengue Control: Check, Clean and Cover" असे असून त्याचे मराठी भाषांतर "डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग : साठवलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा" असे आहे.

महानगरपालिकेमार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले की, घराच्या परिसरात पाणी साचू देऊ नये, पाण्याची भांडी नियमित स्वच्छ ठेवावीत व झाकून ठेवावीत तसेच दर आठवड्याला 'ड्राय डे' पाळून डेंग्यू प्रतिबंधासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा.

# "जसं सुचलं तसं" या पुस्तक प्रकाशन सोहळा संपन्न



मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- ठाणे जवळील कळवा येथील ब्राह्मण सभेच्या सभागृहात सौ. रंजना रमाकांत बाऱ्हाळे लिखित "जसं सुचलं तसं" या पुस्तकाचे दिमाखात प्रकाशन पार पडले. एडवोकेट श्री.आर.सी. मातकर, डॉ. अभय मंडलिक, आणि डॉक्टर मिलिंद कांजाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाचे सूत्र संचलन चैतन्य बाऱ्हाळे यांनी केले. रमाकांत बाऱ्हाळे यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत करून त्यांचा सविस्तर परिचय करून दिला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस लेखिका सौ.रंजना बाऱ्हाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यामध्ये त्यांनी लिखाणा मागची प्रेरणा विशद केली तसेच आपले पती रमाकांत यांच्या सकारात्मक पाठिंब्याबद्दलही माहिती दिली. डॉ. अभय मंडलिक यांनी लेखिकेच्या लेखनाबद्दल माहिती सांगून भविष्यात त्यांनी आणखी लिखाण करावे अशी शुभेच्छा व्यक्त केली.

डॉ. कांजाळकर यांनी लेखिके बद्दल व्यक्तिगत माहिती सांगून त्यांच्या लिखाणा मागील प्रेरणे बद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमासाठी ठाणे आणि कळवा परिसरातील साहित्यप्रेमी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. चैतन्य बाऱ्हाळे यांनी आभार प्रदर्शन केले. अल्पोपहारानंतर कार्यक्रमाचे समापन झाले. कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि मुंबई येथून बाऱ्हाळे कुटुंबीयांचे परिचित आले होते.

# मिरचीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून निर्यात योग्य उत्पादन गरजेचे-सुरेंद्र देशमुख



सिल्लोड दि.१६ (प्रतिनिधी)- नुकताच मौजे शिवणा ता.सिल्लोड येथे कृषी विभाग व ॲग्रो इंडिया शेती संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २६१ व्या द्वादस शेतकरी प्रशिक्षण व मेळावा आयोजन करण्यात आला होता. यावेळी सुरेंद्र देशमुख, सरव्यवस्थापक, भाजीपाला संशोधन विभाग अजित सीड्स प्रायव्हेट लिमिटेड, यांनी मिरची पिकाविषयी सविस्तर मार्गदर्शन करताना मिरचीच्या लागवडीच्या आधुनिक पद्धती, किड रोग नियंत्रण , तसेच मिरचीच्या निर्यात योग्य उत्पादनासाठी वापरावयाचे आधुनिक तंत्रज्ञानाविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी प्रत्यक्ष मिरची प्लॉटला भेट देऊन उन्हाळी मिरची केव्हा लावावी आणि त्यासाठी मध्ये थोडे मकाची लागवड केल्यास या सावलीचा मिरचीला कसा फायदा होऊ शकतो याविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर या शेतकरी मेळावा व प्रशिक्षणाचे अध्यक्ष म्हणुन गट शेती प्रणेते तथा आंबा बाग तज्ञ डॉ.भगवानराव कापसे यांनी आंबा पिकाची अतीघन लागवड या विषयावर उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले यावेळी त्यांनी शेती परवडत नाही या विषयाचे खंडन करून शेती पारंपारिक पिकांची लागवड करण्यापेक्षा उद्योग व्यवसाय म्हणून स्वीकारून फळपिकाची लागवड केल्यास कमी क्षेत्रामध्ये अधिक उत्पादन घेऊन आर्थिक उन्नती साधता येते. यावेळी त्यांनी आंबा लागवड पद्धत उत्पादन ते निर्यात या विषयावर मार्गदर्शन करून आर्थिक गणित समजावून सांगितले तसेच त्यांनी भाजीपाला पिकांचे क्लस्टर तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले. असे क्लस्टर केल्यास आपणास सिल्लोड भागातून डायरेक्ट आपला मिरची व इतर भाजीपाला परदेशात निर्यात होऊ शकतो हे सांगताना त्यांनी लगेच सर्वांना ऐकू येईल असे मिरचीचे देशातील सर्वात मोठे निर्यातदार के बी एक्सपोर्ट चे चेअरमन श्री प्रकाश भाई यांच्याशी संपर्क साधून शेतकऱ्यांना आपण त्यांची निर्यात करू असे मधून घेतली.

या कार्यक्रमात धांडे मार्केटिंग प्रमुख अजित सीड्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी सुद्धा भाजीपाला पिकाविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. सुरुवातीस कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी श्री संदीप जगताप यांनी केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास बनकर यांनी केले. सदर प्रशिक्षणासाठी तालुक्यातील आणि परिसरातील सरपंच सदस्य व प्रगतिशील शेतकरी तसेच कृषी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात 'नशामुक्त भारत अभियान' जाणीव जागृतीसाठी तरुणांनी सक्रिय सहभाग घ्यावा

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- तरुणाईला अंमली पदार्थांच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी जिल्ह्यात आजपासून दि. १५ मे ते ३० जून २०२६ या कालावधीत नशामुक्त भारत अभियान विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासन, समाज कल्याण विभाग आणि जय विश्वकर्मा सर्वोदय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने या व्यापक मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये, नर्सिंग स्कूल, आयटीआय आणि कोचिंग क्लासेसमध्ये जनजागृती केली जाईल. यामध्ये प्रामुख्याने जनजागृती रॅली , चर्चासत्रे,सामूहिक नशामुक्ती प्रतिज्ञा ,निबंध व चित्रकला स्पर्धा,कलापथक आणि पथनाट्ये,विशेष व्याख्याने या द्वारे जाणीव जागृती करण्यात करण्यात येणार आहे. मोहिमेत जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी बाबासाहेब अरवत आणि समितीचे सदस्य विलास चंदने यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# युवकांसाठी अमृतचे ड्रोन प्रशिक्षण; परवानाही मिळणार

## खुल्या प्रवर्गाच्या आर्थिक दुर्बल घटकातील युवकांनी अर्ज करावेत

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- आजच्या आधुनिक काळात शेती, फोटोग्राफी, सर्वेक्षण, सुरक्षा तसेच अनेक तांत्रिक क्षेत्रांमध्ये ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. भविष्यातील गरज ओळखून महाराष्ट्र शासनाच्या अमृत संस्थेमार्फत खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल युवकांसाठी पूर्णपणे मोफत ड्रोन ऑपरेटर (पायलट) प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण यशस्वीरत्या पूर्ण केल्यानंतर उमेदवारांना अधिकृत ड्रोन पायलट परवाना दिला जाणार आहे.

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेच्या "अमृत ड्रोन मिशन" अंतर्गत हा उपक्रम राबवला जात आहे. ग्रामीण भागातील युवकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

प्रशिक्षण कालावधी १० दिवस असून प्रशिक्षण पूर्णपणे मोफत आहे.प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांची राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था संस्थेमार्फत केली जाईल. प्रशिक्षणानंतर अधिकृत ड्रोन पायलट परवाना मिळणार, ज्यामुळे करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहे.

इतर कोणत्याही शासकीय संस्था किंवा महामंडळांचा लाभ न मिळणाऱ्या खुल्या प्रवर्गातील २५ जातींमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक या योजनेसाठी पात्र आहेत. यामध्ये प्रामुख्यान ब्राह्मण, कायस्थ, कोमटी/वैश्य, मारवाडी, पटेल, राजपूत, यलमार, अय्यंगार, राजपुरोहित, पाटीदार, नायर, नायडू, कम्मा, कानबी, सिंधी, बनिया, बंगाली, त्यागी, सेनगुनथर, गुजराथी, ठाकूर, जाट, लोहाना, हिंदू नेपाळी व भूमिहार या जातींचा समावेश आहे.

कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे.

वय१८ ते ५५ वर्षांदरम्यान. असावे किमान १२ वी उत्तीर्ण. असावा.अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य. आहे

शेतकरी कुटुंबातील उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाईल. अर्जासोबत वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा. अधिक माहितीसाठी अमृत जिल्हा कार्यालय, पुंडलिक नगर रोड, सेक्टर ४, (सिडको), हनुमाननगर, पाण्याच्या टाकीजवळ, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क करावा असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक अक्षय लंबे आणि उपव्यवस्थापक योगेश रोडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# मोबाईल हिसकावणारा सराईत आरोपी गुन्हे शाखेकडून अटकेत



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- शहरातील मोबाईल हिसकावण्याच्या गुन्ह्यात गुन्हे शाखेने कारवाई करत सराईत आरोपीला अटक केली असून चोरीस गेलेला मोबाईलही जप्त करण्यात आला आहे.

जवाहरनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १७२/२०२६ अन्वये कलम ३०४(२), ३५१(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील फिर्यादी नंदकिशोर लक्ष्मण कुंजर (वय ४७), व्यवसाय डिलिव्हरी बॉय, रा. उद्योगनगर, नारेगाव, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रार दिली होती.

हा प्रकार ८ मे २०२६ रोजी पहाटे २.०५ वाजण्याच्या सुमारास घडला होता. त्यानंतर गुन्हे शाखेचे पथक शहरात पेट्रोलिंग करत असताना १४ मे रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, चोरीस गेलेला मोबाईल रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार मुकेश उर्फ मुक्या महेंद्र साळवे (वय २६, रा. स्मशानभूमीजवळ, मुकुंदवाडी, छत्रपती संभाजीनगर) याने चोरला आहे.

माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याच्याकडून चोरीतील मोबाईल जप्त करण्यात आला. तसेच या गुन्ह्यातील इतर साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

या कारवाईत वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, पोलीस उपनिरीक्षक अर्जुन कदम तसेच राजेंद्र साळुंके, योगेश गुप्ता, श्रीकांत काळे, मनोहर गिते आणि विक्रम खंडागळे यांनी सहभाग घेतला.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रत्नाकर नवले आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. गुन्हेगारांवर पोलिसांचा वाढता दबाव कायम असून शहरातील गुन्हेगारीवर अंकुश आणण्यासाठी विशेष मोहिमा सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

# रस्त्यावर थांबलेल्या फोटोग्राफरची बॅग हिसकावली; एमआयडीसी सिडको पोलिसांची धडाकेबाज कारवाई, आरोपी जेरबंद



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- रस्त्यावर उभ्या असलेल्या एका तरुण फोटोग्राफरची कॅमेऱ्यांनी भरलेली बॅग हिसकावून पळ काढणाऱ्या आरोपीला एमआयडीसी सिडको पोलिसांनी अटक करत तब्बल १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे शहरातील गुन्हेगारांमध्ये खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी चैतन सोमेश जैस्वाल (वय १९, व्यवसाय फोटोग्राफर, रा. तिरंगा चौक, रेल्वे स्टेशन परिसर) यांनी फिर्याद दिली होती. दि. १ मे २०२६ रोजी तिरंगा हॉटेलजवळ, बीड बायपास रोड येथे ते उभे असताना आरोपींनी त्यांच्या हातातील कॅमेऱ्यांची बॅग हिसकावून नेली होती. यानंतर एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०४(२), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दरम्यान, दि. १५ मे रोजी सकाळी सिडको पोलीस गुन्हेशाखेचे पथक सातारा, उस्मानपुरा, जवाहरनगर, पुंडलिकनगर आणि मुकुंदवाडी परिसरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी कार्तीक कैलास जाधव (वय १९, रा. मुकुंदनगर, मुकुंदवाडी) याला ताब्यात घेतले.

चौकशीत त्याने साथीदार शंकर शेलार आणि एका विधी संघर्ष बालकासह मिळून हा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींकडून चोरीस गेलेले दोन व्हिडीओ शूटिंग कॅमेरे, त्यांच्या बॅटऱ्या तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली मोटारसायकल असा एकूण १ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात शंकर शेलार हा अद्याप फरार असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे. ही उल्लेखनीय कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या नेतृत्वाखाली पोउपनि जगन्नाथ मेनकुदळे, शोन पवार, सुनिल जाधव, सुनिल पाटील, वाडीलाल जाधव, दीपक शिंदे आदींच्या पथकाने केली. पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) रत्नाकर नवले आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.

(पान १ वरून)

## सरकारकडून ओबीसींच्या...

परीक्षेच्या संधीत सवलत गेतल्यास विशेष लाभ मानला जाणार. अशा उमेदवारांची गणना केवळ त्यांच्या मूळ राखीव प्रवर्गातच होईल. ज्या उमेदवारांनी कोणत्याही टप्प्यावर सवलत घेतली नाही, ते गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातून निवडीस पात्र असतील. विविध आरक्षणांमुळे राज्यात नोकरीचे आरक्षण ७२ टक्क्यांवर पोहोचले आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील उपलब्ध जागांचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले आहे. त्यामुळे या प्रवर्गात स्पर्धा वाढल्यामुळे समान संधीच्या धोरणांतर्गत हा निर्णय घेण्यात आल्याचा युक्तिवाद सरकारने घेतला आहे.

विजय वडेट्टीवार यांनी पेट्रोल - डिझेलच्या दरवाढीवरूनही सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, जनतेला पेट्रोल डिझेल कमी वापरा म्हणून उपदेश करणाऱ्या सरकारने, तेल कंपन्यांना निर्यात कमी करा असं सांगायची हिंमत का दाखवली नाही? १ लाख ३२ हजार कोटींचं कच्चं तेल आयात करायचं, त्यातील ५२ हजार ८७६ कोटींचं तेल परदेशात विकायचं आणि मग देशातील नागरिकांच्या खिशातून महाग पेट्रोल डिझेलच्या नावाखाली पैसे वसूल करायचे. म्हणजे नफा कंपन्यांचा आणि लूट सामान्य माणसाची.

भारतीय जनता पार्टी सरकारला जनतेच्या खिशाची नाही तर उद्योगपतींच्या तिजोरीची जास्त काळजी आहे, हे पुन्हा स्पष्ट झालं. स्वतःच्या अपयशावर पडदा टाकण्यासाठी देशभक्तीच्या घोषणा दिल्या जातात आणि दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाला अक्षरशः पिळलं जातं. जनतेला गाडी कमी चालवा सांगणाऱ्यांनी आधी कंपन्यांचा लोभ कमी करावा. नाहीतर हे सरकार जनतेसाठी नसून काही मोजक्या लोकांच्या फायद्यासाठी चालतंय, हा संशय आता विश्वासात बदलायला वेळ लागणार नाही.

## भारतीय वस्तूंवर कर आकारणे नेपाळ...

१०० रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या वस्तूंवर सीमाशुल्क आकारणे हे 'सीमाशुल्क कायदा २०२४' च्या तरतुदींचे उल्लंघन करणारे आणि बेकायदेशीर आहे. दोन्ही बाजूंच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने या नियमाला तात्पुरती स्थगिती देण्याचा निर्णय घेतला. तसेच अंतिम निकाल लागेपर्यंत पूर्वीचीच व्यवस्था लागू ठेवण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत.

## चौथीतील विद्यार्थिनीसोबत शिक्षकाकडूनच....

नंदलाल मराठे विरुद्ध पोक्सोनुसार गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, शाळेला उन्हाळी सुटी लागल्यानंतर ती सुट्यांमध्ये मावशीकडे गेली असता तिथे तिची तब्येत बिघडली आणि तिने जेवण करणे बंद केले. नातेवाइकांनी तिला विश्वासात घेऊन विचारपूस केली असता तिने रडत रडत तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला. हा शिक्षक मागील दोन वर्षांपासून सातत्याने मुलीचे लैंगिक शोषण करत होता. या प्रकाराला विरोध केल्यास तो तिला मारहाण करायचा आणि कोणाला सांगितल्यास तुझे आई-वडील मरून जातील, अशी धमकी देऊन तिला गप्प बसवत असे, असे संबंधित पीडित मुलीचे म्हणणे आहे.

## राज्यात तासाला एका महिलेवर अत्याचार,...

कायदा आणि सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. याची नोंद सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी घेतली पाहिजे. या प्रकरणांमध्ये राजकारण करू नये, कारण मी सुद्धा एका मुलीचा वडील आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे महिलासाठी असलेले धोरण आपल्याला माहिती आहे. पण गेल्या काही दिवसांमध्ये ज्या घटना झाल्या त्यामुळे मन सुन्न होते. या सर्व प्रकरणात कठोर कारवाई झाली पाहिजे. महाराष्ट्रात तासाला एका महिलेवर अत्याचार होतो.

रोहित पवार म्हणाले की, मुंबईत सुद्धा महिला सुरक्षित दिसून येत नाही. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. मुली गायब होतात त्या जातात कोठे या बद्दल काही माहिती मिळत नाही. ३११४१ मुलींचे झाले काय? असा सवाल रोहित पवारांनी केला आहे. युपीनंतर महिला महाराष्ट्रात असुरक्षित आहेत असा अहवाल आहे. महिला अपहरणाच्या विषयात महराष्ट्र देशात पहिला आहे.

रोहित पवार म्हणाले की, अत्याचाराच्या घटनेत फास्टट्रॅक कोर्टात खरच न्याय मिळतो का? पीडितेच्या कुटुंबियांना खरच न्याय मिळाला पाहिजे. शक्ति कायद्यात ३० दिवसांत चार्जशिट, ३० दिवसांत सुनावणी पूर्ण आणि त्यानंतर शिक्षा होते. शक्ति कायद्यात फक्त महिलांसाठी कोर्टची तरतूद आहे. प्रत्येक जिल्ह्यात कोर्टची स्थापन झाली आहे. शक्ती कायदा देशाला दिशा देणारा कायदा असून त्याची अंमलबजावनी व्हावी, असेही रोहित पवार म्हणाले.